॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची प्रवेश पुर्व परीक्षा (पेट) गुरूवार दि. २ जानेवारी पासून सुरळीत सुरु झाली. पहिल्या दिवशी ८०६ विद्यार्थ्यापैकी ६१४विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा केंद्रात पेट परीक्षा सुरु झाली असून दि. ५ जानेवारीपर्यंत विविध विषयांची पेट परीक्षा सुरु राहणार आहे. पहिल्या दिवशी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील काही विषयांच्या चार सत्रात परीक्षा झाल्या. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुसचिव डॉ. विनोद पाटील, प्रा. समीर नारखेडे यांनी परीक्षा केंद्राला भेट देऊन पाहणी केली.

एकूण २४६४ विद्यार्थी परीक्षेला बसले असून पहिल्या दिवशी ८०६ विद्यार्थ्यांपैकी ६१४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली १९२ विद्यार्थी अनुपस्थित होते. मुख्य समन्वयक म्हणून प्रा. मनोज पाटील, समन्वयक म्हणून प्रा. सुरेंद्र कापसे, केंद्र प्रमुख म्हणून प्रा. के.एफ. पवार तसेच तांत्रिक अधिकारी म्हणून दाऊदी हुसेन काम पाहत आहेत. संशोधन विभागातील अधिकारी व कर्मचारी हे परीक्षा सुरळीत होण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २ जानेवारी, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी